सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ - महाराष्ट्र

सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

ऑगस्ट-२०२२

वर्ष -३, अंक-१०

कार्यालय - संत एकनाथ नगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७


## सेवक संघ विशेष वृत्त

### पाणलोट क्षेत्रात उपचार (CAT) कामासाठी सेवक संघ आमंत्रित.

सेवक संघाचे जेष्ठ सदस्य व अनेक कामांचे समन्वयक, मार्गदर्शक श्री. पत्की यांच्या प्रयत्नातून महाराष्टातील धुळे, ठाणे व नागपूर वनवृत्तातील पाणलोट क्षेत्रात उपचार दिलेल्या ४६ स्थळांचे (क्षेत्र-८७४ हेक्टर) मूल्यांकन करण्यासाठी काम मिळाले असून त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅम्पा महाराष्ट्र, नागपूर याचेशी समझोता अभिलेख करणेत आला आहे. सेवक संघाचे वतीने श्री. एस. के. गवळी, उपाध्यक्ष यांनी समझोता अभिलेख स्वाक्षरीत केला. सदर कामासाठी ७ चमू गठीत करण्यात आले असून त्यात सर्वश्री एम. एम. कुलकर्णी, उमेश धोपेश्वरकर, जयप्रकाश पाटील, ए. एस. खुणे, बी. बी. जोमीवळे, बी. आर. छल्लारे, आर. जी. राणे, संजय पांडे, बी. बी. निकम, एन. आर. निकम यांनी सहभागासाटी होकार कळविला आहे. श्री. गवळी हे चमू प्रमुख व श्री. पत्की सर मार्गदर्शक म्हणून सेवक संघाचे या मोहिमेत सेवा देत आहेत.

### श्री. पी. बी. धानके यांचा सचिव पदाचा राजीनामा

श्री.धानके यांनी राष्टीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रादेशिक कार्यालय नवी मुंबई अधिनस्त समन्वयक पदावर नेमणुकीचे कारणाने सेवक संघाच्या कार्यकारी समितीच्या सचिव पदाच्या कामाच्या जबाबदारीतून मुक्त करण्यास विनंती केली होती. अध्यक्षांकडून ती मान्य होउन काही काळ श्री एम एम कुलकर्णी आणि श्री धोपेश्वर यांना काम सुरळीत पार पाडण्याची विनंती करण्यात आली आहे.

## धुळे शाखा विशेष उपक्रम

*******************************

### नंदुरबार वन विभाग सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत अपडेट ......

उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग यांचेकडून प्रायोगिक एकूण ५ गावांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्या -बाबत कार्यारंभ आदेशाप्रमाणे. त्याकामी गठीत ४चमूंचे सामुहिक वन हक्क क्षेत्रास भेट देऊन व ग्रामस्थांची सभा वगैरे काम पूर्ण झाले आहे. आराखडे लिखाणकाम प्रगतीवर आहे.

१)तोरणमाळ येथील सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडा दि. ५-८-२२ रोजी ग्राम सभेत सादर करणेत येवून त्यास मान्यता घेतली आहे.सदर आराखडा जिल्हास्तरीय समितीची मंजूरी घेण्यासाठी उप वन संरक्षक, नंदुरबार यांच्याकडे सादर करणेत आला आहे.

२) श्री. जे.ए. पाटील व एन.एम. निकुमे दि १७ व १८जुलै रोजी बिलमांजरे ता. नवापूर गावाचे सामुहिक वन हक्क क्षेत्रास भेट देऊन व ग्रामस्थांची सभा घेतली.

३) श्री. एम. कुलकर्णी व श्री धोपेश्वरकर चमूने दि २६ व २७ जुलै रोजी वाघाळे गावाचे सामुहिक वन हक्क क्षेत्रास भेट देऊन व ग्रामस्थांची सभा ग्रामस्थांची सभा घेतली. त्यांना उत्तम सहकार्य मिळाले.

४) श्री.पी. आर. पाटील व बी.बी. जोमीवाळे चमू दि २ व ३ ऑगस्ट रोजी असली गावाचे सामुहिक वन हक्क क्षेत्रास देऊन व ग्रामस्थांची सभा ग्रामस्थांची सभा घेतली.

## अमरावती शाखा विशेष उपक्रम

सेवक संघ मार्फत आयोजित वनविकास महामंडळाचे वन अधिका-यांकरिता 22 ते 24 ऑगस्ट 2022 पर्यंत वन कायदा व त्याचा वनगुन्हा तपासात यथायोग्य वापर याविषयी प्रशिक्षण शहापूर येथे श्री. संजय जगताप व श्री. धोंगडे यांनी दिले.

श्री. चंद्रशेखर धुमाळ, सेनि वन संरक्षक, हे पुणे शाखेचे आजीवन सदस्य झाले आहेत. त्यांचे सेवक संघ परिवारात सहर्ष स्वागत.

## या अंकात


१. पाणलोट क्षेत्रात उपचार (CAT) कामासाठी सेवक संघ आमंत्रित. ....... १

२. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे अपडेट ....... १

३ राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे भेटीसाठीचे शिष्ट मंडळात श्री गवळी यांचा समावेश . . . . १


४. आजीवन सदस्य ....... १

५. बिबट्या आणि माणूस संघर्ष – पर्यायी उपाययोजना लेखमाला . . . . . २


### मा. राज्यपालांचे भेटीसाठी गठीत शिष्ठमंडळात श्री. एस.के. गवळी यांचा समावेश

**मा. भगतसिंग कोश्यारी, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे भेटीसाठीचे शिष्ट मंडळात श्री एस.के. गवळी यांचा समावेश**





वन हक्क प्रस्ताव उपविभागीय स्तरीय समिती शिरपूर व जिल्हास्तरीय समिती धुळे यांच्याकडे गेल्या 8 ते 10 वर्षांपासून प्रलंबित आहेत. हे दावे मंजूर होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत. शिरपूर तालुक्यातील दुर्गम भागातील आदिवासी समाज अनेक वर्षांपासून वाडा, पाडा, वस्त्या, गावे,समूह खेडे अशा पेसा गावांना महसुली गावे म्हणून जाहीर करून महसुली गावांचा दर्जा प्राप्त करून द्यावा या मागण्यांसाठी आ. अमरीश भाई पटेल, आ.काशीराम पावरा आमदार

यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नुकतीच राज्यपाल भरत सिंह कोशारी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या शिष्टमंडळात सदस्य श्री एस.के. गवळी यांना वनविषयक बाबींचे सल्लागार-तज्ञ म्हणून आमंत्रित करून समावेश करण्यात आला होता.

## कार्यकारी मंडळ बैठक वृत

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाची ऑगस्ट महिन्याची सभा झाली नाही.

*******************************

## बिबट्या आणि माणूस संघर्ष – पर्यायी उपाययोजना

* प्रभाकर कुकडोलकर



देशात उसाच्या लागवडीत उत्तर प्रदेशापाठोपाठ महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. पुणे,सातार,कोल्हापूर, सोलापूर,अहमदनगर आणि औरंगाबाद या जिल्ह्यात उसाची मोठया प्रमाणावर लागवड होत असली तरी अजिबात उस लागवड नाही असा जिल्हा महाराष्ट्रात आज तरी नाही. हवामान बदलामुळे शेती किफायतशीर राहिलेली नाही अशी कितीही ओरड होत असली तरी राज्यात दरवर्षी उसाच्या लागवडी खालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत आहे. चांगला पाउस झाला तर भविष्यातही उसाखालचे क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे हे गेल्या वर्षीच्या अनुभवावरुन लक्षात येते.२०२१ मध्ये राज्यातील उसाचे क्षेत्र आठ ते दहा टक्याने वाढण्याची शक्यता शासकीय विभागाने यापूर्वीच वर्तविली आहे. राज्यातील दख्खनच्या पठारावरील लाव्हा रसापासून बनलेली काळी जमीन उसाच्या लागवडीसाठी उपयुक्त असल्याने आणि उसाचे पिक फायदेशीर ठरत असल्याचे केवळ बिबटयाची भीती दाखवून शेतकऱ्यांना उसाचे पिक घेण्यापासून परावृत्त करणे केवळ अशक्य आहे.शेतकऱ्यांची बाजू घावी तर पर्यावरण वादी आहेतच बिबटयाची बाजू घेऊन ओरड करायला! म्हणूनच राज्यात उसाची शेती, बिबटया आणि माणूस हे एक मोठंच त्रांगड झालं आहे.धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय या संभ्रमावस्थेतून वन विभाग बाहेर पडायला तयार नाही, बिबटयामुळे उसाची शेती सोडायला शेतकरी तयार नाही आणि जीवाला धोका आहे हे लक्ष्यात येउनही बिबटया उसाचा अधिवास सोडायला तयार नाही. अशा अवघड परिस्थितीत प्रश्नाची उकल करणेसाठी उपाय योजना सुचविणे मोठे आव्हानच आहे. असे असले तरी काळाची गरज ओळखून हे काम प्राधान्याने करण्याची आज गरज आहे. अन्यथ: ही समस्या येत्या काही वर्षात अधिक उग्र होण्याची आणि त्यात बिबटया बरोबरच मोठया प्रमाणावर मनुष्यहानी होण्याची शक्यता आहे. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२च्या परिशिष्ट एक मध्ये बिबटयाचा समावेश असल्याने कायद्याने बिबटयाला मोठे संरक्षण आहे. त्यामुळे ज्या क्षेत्रात बिबटयाची संख्या प्रमाणाबाहेर वाढली आहे तेथे तात्पुरत्या कालावधीसाठी बिबटयाचा समावेश खालच्या परिशिष्टीमध्ये करुन कायद्याने त्याला दिलेले संरक्षण काढून घेण्याचा सर्वाधिक सोपा उपाय सुचविण्यात येत आहे. त्यासाठी बिहार सरकारने काही वर्षांपूर्वी निलगायींची संख्या कमी करण्यासाठी त्यांना परिशिष्ट तीन मधून परिशिष्ट पाच मध्ये म्हणजे उपद्रवी प्राण्यांच्या यादीत टाकून त्यांची गोळया घालून कत्तल करण्याचे अधिकार राज्य शासनाला बहाल करण्यात आले त्याचा आधार घेण्याचा प्रयत्न काही लोक करत आहेत. राज्य शासनाने निलगायींना मारण्याचे कंत्राट खाजगी व्यक्तीला दिले आणि त्या नंतर त्यांनी ज्या पद्धतीने निलगायींची कत्तल केली त्याची दृश्ये सामाजिक माध्यमांतून व्हायरल झाल्यावर भारतभर जो जनक्षोभ झाला, सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली त्यानंतर बिहार राज्य शासनाला त्यांचे आदेश तातडीने मागे घ्यावे लागले. निलगाय तर दुर्मिळ प्राण्यात मोडत नव्हती तरी लोकांनी अशा प्रकारे त्यांची हत्या करण्याला विरोध केला तर बिबटयासारख्या दुर्मिळ प्राण्यांचा बाबतीत लोक गप्प बसणार नाहीत हे लक्षात घेऊन हा उपाय अवलंबणे आजच्या घडीला तरी राज्य शासनाला शक्य होईल असे वाटत नाही. मुळातच एखादया वन्य प्राण्याला वरच्या परिशिष्टीतून खालच्या परिशिष्टीत टाकण्याचे अधिकार केवळ केंद्र सरकारला आहेत.आणि तसे करायला संशोधनाचा आधार लागतो. सध्याच्या परिस्थितीत केंद्र आणि राज्य सरकारचे ताणलेले संबंध लक्षात घेता अशी परवानगी राज्याला सहजपणे मिळेल असे दिसत नाही आणि बिबटया बाबत फारसे संशोधनही उपलब्ध नाही. त्यामुळे आपल्याला इतर पर्यायांचा विचार करावा लागेल. मानव वन्य प्राण्यांचा संघर्ष कमी करायचा असेल तर आपल्याला सर्व प्रथम धोरण निश्चित करावे लागेल व त्यावर आधारित १० ते २० वर्षाचा कृती आराखडा तयार करून निर्धाराने त्याची अंमलबजावणी करावी लागेल यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करत आलो आहे. माझ्या **'बिबटया आणि माणूस'** या गेल्या वर्षी प्रकाशित झालेल्या पुस्तकात या संबंधी एक स्वतंत्र लेखही समाविष्ट केला आहे. गेल्याच आठवडयात वन विभागाने वन्यजीव व्यवस्थापनाचा दहा वर्षाचा आराखडा तयार करण्याची घोषणा केली आहे ही चांगली बाब आहे. पण त्या आधी धोरण निश्चित केले असते तर आराखडा तयार करणे अधिक सोपे झाले असते. अजूनही वेळ गेलेली नाही.

--उर्वरीत भाग पुढील अंकात..

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र,पुणे
संपादन - एस. के. गवळी